## वसई-विरार शहर महानगरपालिका
### क्रीडा व सांस्कृतिक विभाग

दि.२२/०५/२०२४

**प्रेसनोट**

नरवीर चिमाजी अप्पा यांच्या शौर्याने प्राप्त झालेल्या वसई किल्लाच्या विजय दिन साजरा करण्यासाठी दरवर्षी वसई किल्ल्यावर बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी वसई विरार शहर महानगरपालिकामार्फत वसई विजयोत्सव दिन हा एकदिवसीय कार्यक्रम आयोजित केला आहे.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून वसई किल्ला इतिहास, ऐतिहासिक वास्तू व येथील पर्यटन, लोकसंस्कृती, खाद्यसंस्कृती माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहचून येथे जास्तीत, जास्त रोजगार निर्माण व्हावा या उद्धेशाने वसई विरार महानगरपालिका दरवर्षी वसई किल्ला येथे वसई विजयोत्सव दिनाचे आयोजन करते.

परंपरेप्रमाणे बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून गुरुवार दि. २३ मे,२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता श्री वज्रेश्वरी देवी मंदिर, वज्रेश्वरी येथून मशाल प्रज्वलित करून मोटार बाईक रॅली द्वारे वसई पारनाका येथे आणण्यांत येईल. तदनंतर ५ वाजता वसई पारनाका ते नरवीर चिमाजी अप्पा स्मारक येथे मशाल मिरवणूक काढण्यात येईल. या मिरवणुकीत पारंपारिक पोशाखात नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

मशाल रॅली नंतर सायंकाळी ६.०० वाजता बुद्ध प्रतिमेला व नरवीर चिमाजी अप्पा यांच्या अश्वारूढ प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे.

तरी सर्व नागरिक यांनी सदर दिवशी वसई विजयदिन कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे करण्यांत येत आहे.

**क्रीडा व सांस्कृतिक विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**